दि.१२-११-२०२५

<u>अर्जदारातर्फे पुढील सरतपास वकिल श्री. एस. बी. सानप यांच्यातर्फे शपथेवर सुरु</u>

४. माझ्या सरतपासणी शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

५. आता मला प्रकरणात दाखल असलेले नियमीत दिवाणी दावा क्र. २९/२०१६ ची नि.१ दाव्याची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. त्यास **नि. क्र.१६** देण्यात येते. आता मला प्रकरणात दाखल असलेली नियमीत दिवाणी दावा क्र २९/२०१६ मधील प्रकरणाची रोजनाम्याची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली. त्यास **नि. क्र १७** देण्यात येते.

सरतपास पूर्ण

<u>उलटतपास गैर अर्जदारातर्फे वकिल श्री ए. व्ही. काकडे यांच्यामार्फत</u>

६. मी माझे शपथपत्र फेर क्र. १७० रद्द करण्यासाठी दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रामध्ये फेरफार नोंदीशिवाय इतर कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर शपथपत्र दाखल करताना केवळ फेरफार नोंद क्र. १७० रद्द करुन मिळण्याबाबतच केवळ मी सांगितले होते.

७. वादग्रस्त मिळकतीचा गट क्र. २११ आहे. सदर दाव्यामध्ये किती क्षेत्राबाबत वाद चालू आहे हे मला सांगता येणार नाही. सदर दाव्यामध्ये फेर क्र १७० बाबत दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा पुराव्याला लागल्यानंतर दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत पुराव्यासाठी ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर पुराव्यासाठी दहा ते बारा वेळा मला संधी देण्यात आली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझे दुखत असल्यामूळे मी हजर राहत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की,माझ्या प्रस्तुतच्या अर्जामध्ये व सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये मी आजारी असलेबाबतचा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या कालावधीमध्ये आजारी असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आज रोजी माझ्याकडे उपलब्ध नाही व तसा कोणता कागदोपत्री पुरावा या प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल केला नाही.

८. गैरअर्जदार संगिता ही माझी सख्खी बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिने माझ्या विरुध्द वादग्रस्त मिळकती विषयी प्रतिदावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिला प्रतिदाव्यामध्ये लवकर न्याय मिळू नये म्हणून मी प्रयत्न करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, या कारणामूळेच मी त्या प्रकरणामध्ये दोन वर्षापर्यंत पुरावा दिलेला नाही.

९. मी माझे शपथपत्र दाखल करताना त्यामध्ये वेगवेगळया तारखा नमूद करण्यास सांगितले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. माझे शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे तयार केले हे मला आठवते. सदर शपथपत्रामध्ये कोणत्या क्रमांकाच्या दाव्यासंदर्भात शपथपत्र दाखल केले हे मला सांगता येणार नाही. माझा दावा कधी रद्द झाला त्याची तारीख मला सांगता येणार नाही. सदरचा माझा दावा रद्द झालेबाबत मला माहिती प्रथमतः कधी झाली त्याची तारीख मला सांगता येणार नाही तसेच अंदाजे कधी झाला हे देखील सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा रद्द झालेले मला कसे कळाले याबाबत देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा रद्द झाल्यानंतर मी नकलेचा अर्ज कधी दिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मुद्दे कधी निघाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये कोण कोणत्या तारखा पुराव्यासाठी नेमल्या होत्या हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या तारखा मला माहिती नसल्यामूळे मी सरतपासाचे शपथपत्रामध्ये त्या नमूद केल्या नव्हत्या. हे मला सांगता येणार नाही की दावा खारीज करण्याचा आदेश हा कोरोना महामारीच्या पूर्वी झाला किंवा कसे.

१०. प्रस्तुतचा अर्ज दाखल करताना मी फेर काढला होता या व्यतिरिक्त कोणतेही कागदपत्र काढले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नियमीत दिवाणी दावा क्र २९/२०१६ मध्ये मी माझ्या वकिल साहेबांना माहिती देउन कामकाज चालवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या कामकाजाच्या अनुषंगाने माझा माझ्या वकिल साहेबांसोबत संपर्क होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणाच्या कामकाजामध्ये मी आवश्यक असणारी माहिती वेळोवेळी मी माझ्या वकिल साहेबांना देत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१६ पासून नियमीतपणे केसच्या कामकाजाच्या संदर्भाने माझ्या वकिल साहेबांच्या संपर्कामध्ये आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अर्जातील व शपथपत्रातील मजकूर मी खोटेपणाने लिहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

RAMESH RAOJI BHADRE Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE Date: 2025.11.12 16:03:31 +0530

दि. १२/११/२०२५

( आर. आर. भद्रे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शेवगाव